REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ७ जून, १९५० | अंक २३

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. साळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,१८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेल, लाकूड आणि कोळसा वगैरे.





## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड**

भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**जपानमधील आत्महत्त्यांची वाढ**—जपानमध्यें १९४९ सालीं १८,४२१ लोकांनीं आत्महत्त्या केल्या. कारणांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे. आजाराला कंटाळून ३,६२७; निराशेमुळें ३,६०४; मानसिक रोगानें १,९२१; घरगुती त्रासानें १,३३०; दारिद्र्यानें ८५३; प्रेमभंगामुळें ६४४. उरलेल्या आत्महत्त्यांची वर्गवारी करण्यांत आली नाहीं. १९४८ सालापेक्षा आत्महत्त्येचें प्रमाण १० टक्क्यांनीं वाढलें आहे.

**जपानी कापडवाल्यांची स्पर्धा**—जपानी कापडाचे कारखानदार आपल्या मालाच्या किंमती फार कमी करीत आहेत. ह्या स्पर्धेमुळें ब्रिटिश कापडाला धोका पोचत आहेच, परंतु जपानमधील अर्थव्यवस्थेवरही तिचा परिणाम होऊं लागला आहे. जपानमधील जनतेची क्रय-शक्ति कमी झाल्यानें कापडाची मागणी कमी झाली आहे. त्यामुळें जपानी कारखानदार तोटा सोसूनही परदेशीं कापड विकण्याची पराकाष्ठा करीत आहेत.

**अमेरिकन प्रवाशांचा परदेशी खर्च**—१९४९ सालीं हौशी अमेरिकन प्रवाशांनीं ६९,५०,००,००० डॉलर्स परदेशीय प्रवासांत खर्च केले. हा खर्चाचा आकडा आतापर्यंत सर्वांत अधिक आहे.

**हैद्राबाद येथील साखरेचा कारखाना**—निझाम शुगर फॅक्टरींत साखरेचें उत्पादन अधिक वाढविण्यासाठी नवीन यंत्रें बसविण्याचें काम चालू आहे. बहुतेक सर्व यंत्रसामुग्री आली असून १९५१ च्या आरंभीं ती चालूं होईल असा अंदाज आहे. कारखान्याच्या वाढीमुळें साखरेचें उत्पादन पूर्वीपेक्षा दुप्पट होईल.

**अधिक धान्य पिकविण्याची मोहीम**—सिकंद्राबादच्या कॅंटोनमेंट बोर्डानें आपल्या हद्दींत अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला उत्तेजन दिलें होतें. ह्या मोहिमेच्या प्रत्यक्ष कार्याला कांहीं महिन्यांपूर्वी सुरवात झाली. तेव्हांपासून ८,००० पौंड भाजीपाला आणि ४,००० पौंड धान्य पिकविण्यांत आलें. भाजीपाला लष्कराला पुरविण्यांत आला.

**बनारस विद्यापीठांत कांचेच्या धंद्याचें शिक्षण**—बनारस विद्यापीठानें कांच सामान तयार करण्याच्या धंद्याचें शिक्षण द्यावें म्हणून उत्तर प्रदेशाचें सरकार पुन्हां मदत करणार आहे. ह्या धंद्याचें उच्च शिक्षण देण्यासाठी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत काय बदल करावा लागेल तें ठरविण्यासाठी ४ तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**पेटणारा मासा**—अलास्का द्वीपकल्पाच्या भोंवतीं एक नव्या प्रकारचा मासा सांपडला आहे. हा मासा शेपटीकडून जमीनींत पुरून त्याचें नाक पेटवून दिलें कीं तो मेणबत्तीप्रमाणें जळत रहातो. त्याचा प्रकाश मेणबत्तीच्या तिप्पट असून तो तीन तासपर्यंत जळत रहातो ह्या प्रदेशांत रहाणारे एस्किमो जातीचे लोक त्याचा उपयोग प्रकाशासाठीं करतात किंवा काय ह्याबद्दल शोध चालू आहे.

**स्वित्झरलंडच्या कंपनीवर बहिष्कार**—रशिआ आणि पूर्व युरोपांतील राष्ट्रांना युद्धोपयोगी वस्तू पुरविण्याचें अमेरिकेनें बंद केलें आहे. एका स्विस कंपनीनें एक औद्योगिक रसायन अमेरिकेकडून घेऊन झेकोस्लोव्हिकेला पुरविलें असें आढळून आलें अमेरिकेच्या निर्यात नियंत्रणाच्या नियमाचा भंग केल्याबद्दल वरील स्विस कंपनीला अमेरिकन माल ह्यापुढें पुरविण्यांत येणार नाहीं असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच बहिष्कार आहे.

**ब्रिटिश बुद्धिमत्ता घसरूं लागली**—ब्रिटिश लोकसंख्येचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या रॉयल कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल पांच प्रख्यात शास्त्रज्ञांनीं तयार केला आहे. अहवालांत पुढीलप्रमाणें निष्कर्ष नमूद करण्यांत आले आहेत. (१) १९२० सालापासून ब्रिटिश मुलांमधील बुद्धिमत्तेचा र्‍हास होऊं लागलेला आहे. (२) सामान्यपणें असें आढळतें कीं मोठ्या कुटुंबांतील मुलें लहान कुटुंबांतील मुलांपेक्षा कमी बुद्धिवान असतात. (३) येत्या पन्नास वर्षांत शिष्यवृत्त्या देण्याच्या लायकीचीं मुलें आजच्यापेक्षा निम्म्यानें कमी होतील आणि कमकुवत मनाच्या मुलांची संख्या दुप्पट होईल.

**पाकिस्तानांत काड्याच्या पेट्यांचा धंदा**—पूर्व पाकिस्तान सरकारनें एक पत्रक काढून पूर्व बंगालमधील खुलना परगण्यांत काड्याच्या पेट्यांचा धंदा निघण्यास आवश्यक अशी परिस्थिति असल्याचें निदर्शनास आणलें आहे. काड्याच्या पेट्यांसाठीं लागणारें मऊ लाकूड, स्वस्त मजुरी आणि आवश्यक रसायनें ह्या सर्वांची अनुकूलता वरील परगण्यांत आहे. दररोज १२०० काड्याच्या पेट्या तयार करणारा कारखाना काढण्यास सुमारें एक लाख रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखान्यांत एकच ८ तासांची पाळी ठेवली जाईल असें गृहीत धरण्यांत आलें आहे. ज्यांना हा धंदा काढण्याची इच्छा असेल त्यांनीं पाकिस्तान सरकारच्या सप्लाय अँड डेव्हलपमेंट खात्याकडे चौकशी करावी असें पत्रकांत जाहीर करण्यांत आलें आहे.

**मजूरविषयक कायद्यांत दुरुस्ती**—भारत सरकारच्या विधिमंडळापुढें असलेल्या मजूरविषयक कायद्यांत कांहीं दुरुस्त्या करण्यांत येणार आहेत. मजूर-संघटनांच्या कार्यकारी मंडळावर ५० टक्केपर्यंत संघटनेच्या बाहेरील माणसें नेमण्याची तरतूद सध्या आहे. त्या ऐवजी बाहेरील नेमणुका ४ टक्क्यापर्यंतच मर्यादित करण्यांत येतील. मजूर संघटनांचा पैसा आणि सभासदांचें नोंदबुक ह्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकारहि सरकार घेणार आहे. त्याचप्रमाणें औद्योगिक तंटे शांततेच्या मार्गानें सोडविण्याविषयीं जीं सक्तीचीं कलमें कायद्यांत आहेत, त्यांचा उपयोग करण्याच्या आधीं संपाची अगर टाळेबंदीची नोटीस देण्यांत येऊं नये अशीहि एक दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ७ जून, १९५०





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## हिंदी बँकिंगमधील सहा बड्या प्रकरणें

हिंदी बँकिंगच्या क्षेत्रांत इंपीरिअल बँक, सेंट्रल बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक व बँक ऑफ बरोडा ह्या सहा बँकांचें वर्चस्व आहे. बँकांकडील एकूण ठेवींपैकीं ६२·८% ठेवी १९४९ अखेर ह्या सहा बँकांकडे होत्या. इतर शेड्यूल्ड बँकांपेक्षा त्यांचे पैसे ज्यास्त तरते असतात. ह्या बँकांचें रोख व रिझर्व्ह बँकेंतील शिलकेचें त्यांच्या एकूण ठेवींशीं प्रमाण १७% पडलें, तर इतर शेड्यूल्ड बँकांत तें फक्त ७·५% पडतें. इतर बँका आपल्या ठेवींच्या ६२% कर्जे देतात, तर ह्या सहा बँकांचीं कर्जे ठेवींच्या ३९% च्या बाहेर नाहींत. खालील तक्त्यावरून ह्या सहा प्रस्थांची एकमेकांशीं व एकूण शेड्यूल्ड बँकांशीं होणारी तुलना स्पष्टपणें लक्षांत येईल.

ह्या प्रमुख बँकांचें धोरण व त्यांचे व्यवहार ह्यांचा बँकिंगचे क्षेत्रावर मोठा परिणाम होणें स्वाभाविकच आहे. शेड्यूल्ड बँकांनीं १९४९ अखेर दिलेल्या कर्जांची व बिल डिस्कौंटची रक्कम ४११ कोटी रुपये होती. त्यांत सहा प्रमुख बँकांचा हिस्सा २०९ कोटी रुपयांचा होता. ह्या बँकांनीं कर्जविषयक धोरण बदललें तर कर्ज उपलब्ध होणें त्याप्रमाणें सोपें किंवा अवघड होत जातें. कारण त्यांच्या पुढारीपणाचा स्वीकार इतर बँका करण्याचा प्रयत्न करतात. ह्या सहा प्रमुख बँकांच्या सहकार्यानें रिझर्व्ह बँकेस कोणतीहि योजना किंवा सुधारणा अमलांत आणणें सोपें आहे. कारण, त्यांच्या नियंत्रणाखालीं फार मोठें बँकिंगचें क्षेत्र आहे आणि त्या क्षेत्राचें नियंत्रण थोड्या हातीं एकत्रित झालेलें आहे. खेडेगांवांत बँकिंगचा प्रसार करण्याच्या कामीं मोठ्या बँकांचे हातून अर्थात फारच थोडी कामगिरी झालेली आहे. लहान बँकांना हा प्रसार मुद्दाम घडवून आणणें परवडणार नाहीं, परंतु ज्यांना परवडेल अशा मोठ्या बँकांचे हातून तें होणार नाहीं. बँकिंगच्या कक्षेंत ज्यास्त ज्यास्त संचित पैसा आला पाहिजे; त्याविना भांडवलविषयक वाढत्या गरजा भागविणें कठीण जाईल. प्रमुख सहा बँकांची बँकिंग क्षेत्रावर एवढी पकड असली तरी शेड्यूल्ड बँकांच्या एकूण ३,००० कचेऱ्यांपैकीं फक्त ६०० कचेऱ्याच ह्या सहा बँकांच्या वाट्याच्या आहेत. बँकिंगच्या केंद्रीकरणावर आणि त्याच्या प्रसाराच्या परिस्थितीवर ह्या आकड्यानें चांगला प्रकाश पडतो.

## ऑस्ट्रेलियांतील वन्य जातींच्या चालीरीतींचें मुद्रीकरण

ऑस्ट्रेलियांत श्वेतवर्णीयांनीं पाऊल टाकलें तेव्हां तेथें ३,००,००० वन्य प्रातींचे लोक होते. आतां त्यांची संख्या फक्त ६०,००० उरली आहे. श्वेतवर्णीयांशीं त्यांचा जेथें जेथें संबंध आला, तेथें तेथें त्यांचा वंश नष्ट होत चालला. रेल्वे, मोटार रस्ता, विमान मार्ग, ह्यांच्या वाढीबरोबर हे वन्य रानटी लोक नामशेष होऊं लागले आहेत. तेव्हां, त्यांच्या चाली-रीती, बोलणीं, आवाज, इत्यादींची नोंद राखण्यासाठीं ॲडिलेड विद्यापीठानें डॉक्टर्स, फोटोग्राफर्स, दुभाषिक, इत्यादींचे तांडे ऑस्ट्रेलियाच्या अंतर्गत भागांत पाठवले आहेत. तेथील चर्च मिशनऱ्यांच्या मदतीनें ते स्थानिक जीवनाचा परिचय करून घेतील. ऑस्ट्रेलियाच्या नॅशनल फिल्म बोर्डाचे चेअरमन ह्यांनीं लोकांच्या गुहांतील चित्रकलेचे अनेक फोटो नुकतेच घेऊन ठेवले आहेत. कितीतरी 'नेटिव्ह आर्ट गॅलरीज' सांपडल्या आहेत. ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीचे फेलो फोनोग्राफच्या रेकॉर्डस घेण्यांत गुंतले आहेत. म्हातारे रानटी लोक मरून जाण्यापूर्वी त्यांच्या ज्ञानाचें रेकॉर्ड घेऊन ठेवण्यासाठी धडपड चालू आहे. रानटी लोकांच्या धार्मिक विधींचें रेकॉर्डहि घेतलें जात आहे.

## सहा प्रमुख शेड्यूल्ड बँका व इतर शेड्यूल्ड बँका : तुलनात्मक आकडे (कोटी रुपयांचे)

| | इं. बँक | सेंट्रल बँक | बँक ऑफ इंडिया | पंजाब नॅ. बँक | यु. कमर्शिअल बँक | बँक ऑफ बरोडा | एकूण | सर्व शेड्यूल्ड बँका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५·६३ | ३·१५ | १·९९ | ०·८७ | २·०० | १·०० | १४·६४ | ... |
| जनरल रिझर्व्ह फंड | ६·३० | ३·१६ | १·९९ | १·०० | ०·५३ | १·१४ | १४·१३ | ... |
| मुदती व सेव्हिंग्ज ठेवी | ७१·२५ | ५८·९० | १७·३० | २५·६७ | ११·३६ | १६·६२ | २०१·१० | २६९·०४ |
| करंट ठेवी | १७९·४८ | ६२·८३ | ४२·०८ | १७·२७ | १९·३९ | १४·०७ | ३३५·१२ | ५८४·८५ |
| एकूण ठेवी | २५०·७३ | १२१·७३ | ५९·३८ | ४२·९४ | ३०·७५ | ३०·६९ | ५३६·२२ | ८५३·८९ |
| रोख व रिझर्व्ह बँकेंत | ५२·४३ | १९·०७ | ५·६५ | ४·२९ | ४·०८ | ४·०१ | ८९·५३ | ११३·४३ |
| कॉल मनी | १·२३ | २·५९ | ... | ... | ... | ... | ३·८३ | ... |
| रोखे | ९८·४२ | ५२·०८ | २६·८५ | २१·२७ | १४·५७ | ११·९६ | २२५·४६ | ... |
| शेअर्स व डिबेंचर्स | ०·१३ | ४·७८ | ०·२४ | १·१८ | ०·३३ | १·७० | ८·३६ | ... |
| बिल्स | ५·६९ | ६·५३ | २·२९ | १·५६ | २·३९ | १·०२ | १९·४७ | १५·३५ |
| कर्जे | ८४·६३ | ३६·२१ | २५·९१ | १७·२२ | १२·०३ | १३·५७ | १८९·५७ | ३९५·२५ |
| पुढें ओढलेला शिलकी नफा | ०·५५ | ०·२२ | ०·०५ | ०·०० | ०·०३ | ०·०४ | ०·८९ | ... |

## नियोजन, नेहरू आणि मथाई

( ले.:–श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम. )

डॉ. जॉन मथाई यांनीं अर्थमंत्रिपदाचा राजिनामा देतांना पंडित नेहरूंशीं आपला नियोजन समितीसंबंधानें झालेला मतभेद हें एक प्रमुख कारण म्हणून घोषित केलें आहे. पं. नेहरूनीं त्रिवेंद्रमच्या भाषणांत नियोजनाची आजच्या घटकेला देशाला अत्यंत जरूरी असल्याची आपली खात्री पटलेली आहे असें सांगितलें, तर मथाईनीं आज घटकेला त्याची जरूरी नाहीं असें उलट श्रीनगरहून काढलेल्या पत्रकांत म्हटलें आहे. दोघांनीं उत्तर-दक्षिण टोकावरून काढलेल्या उद्गारांत उत्तर दक्षिण दिशांचाच संबंध आला हें मनोरंजक वाटतें.

दोघांनीहीं आपापल्या परीनें स्वतःच्या बाजूचें समर्थन केलें आहे तें वाचतांना तो तो त्या त्या वेळेस बरोबरच आहे असें जाणत्या वाचकांस वाटल्याशिवाय रहात नाहीं. त्यांत जास्त-कमी बरोबर कोण हें ठरविण्याची वाचकाला उत्कंठा असली तरी तें ठरविणें कठीण आहे आणि आतां त्याची जरूरी नाहीं. मतभेदाच्या युगांत सत्तेचें प्राबल्य राहतें त्यामुळें ज्याच्या पाठीमागें जनतेचें युक्त असो अयुक्त असो बळ असेल तो सत्तेवर स्थिर राहतो व दुसऱ्याला लोकशाहीच्या परिपाठास धरून मागें व्हावें लागतें. तेव्हां मथाईनीं राजिनामा दिला हें योग्यच झालें.

पं. नेहरू जात्या समाजवादी आहेत व स्वतःच्या जगविकासाच्या कल्पनांना धरून आणि त्याबरोबरच काँग्रेसनें दिलेल्या अर्थविकास योजनेसंबंधानें दिलेल्या आदेशाला धरून त्यांनीं नियोजन समितीची उभारणी केली व ते तिचे अध्यक्ष झाले. या समितींत समाजवादी नेहरू अध्यक्ष, मुंबईचे पूर्व–मजूर मंत्रि नंदा उपाध्यक्ष, हे असल्यावर नियोजनसमितीवर देशार्थविकास योजनांची आंखणी करतांना कुठल्या अर्थवादाचें दडपण पडेल हें वेगळें सांगण्याची जरूरी नाहीं. समितीचे दुसरे सभासद गगनविहारी मेहता हे भांडवलदारांचे प्रतिनिधी आणि आतां मथाईच्या मागून अर्थमंत्रि झालेले श्री. चिंतामण देशमुख हे दुसरे सभासद. त्यांच्या विद्वत्ता–अनुभवासंबंधानें वाद नाहींच, व ते कुणाच्या आहारीं जाणार नाहींत याबद्दलची खात्री असली तरी नियोजन समितींत एका बाजूस नंदा–नेहरू आणि दुसऱ्या बाजूनें गगनविहारी मेहता आणि चिंतामण देशमुख असे पूर्व आणि उत्तर पक्ष पडतात काय अशी शंका येते. इंग्लंडमध्यें झालेल्या क्लासिकल अर्थशास्त्राच्या अध्ययनामुळें श्री. देशमुखांचा कल उद्योगस्वातंत्र्याच्या बाजूनें झालेला असल्यास नवल नाहीं.

पं. नेहरू आज नियोजनाची जरुरी आहे असें म्हणतात, त्याला सुबुद्ध हिंदी माणसाचा आशिर्वाद मिळेल यांत शंका नाहीं. कारण त्याला असें वाटत आलेलें आहे कीं नियोजन आजच काय, शंभर वर्षांपासून यावयास पाहिजे होतें. तेव्हां आजच्या पिढीस नियोजनाचें फल मिळालें नाहीं तरी पुढील पिढीस तें मिळालें तरी आनंद आहे, या दृष्टीनें तो नियोजनाचें स्वागतच करील, ही झाली एक बाजू.

आतां डॉ. मथाईच्या म्हणण्याप्रमाणें ( नियोजन समिति अर्थमंत्र्याच्या अधिकारावर आक्रमण करील हा मुद्दा तूर्त बाजूस ठेवून ) देशाची सध्यांची तुटपुंजी साधनसामुग्री आणि तंत्रविशारदांचा अभाव या परिस्थितींत मुख्य प्रश्न सर्वांगीण नियोजनाचा नसून आजच्या घटकेला जास्तींत जास्त जरूर आणि उपयुक्त असतील तेवढ्याच योजना हातीं घेणें आणि चालूं आहेत त्याच योजना पुऱ्या करणें या गोष्टीवरच भर दिला गेला पाहिजे. चालूं योजना सुद्धां पुऱ्या करण्याइतका सरकारजवळ पैसा, मालमसाला आणि मनुष्यबळ नाहीं, तर आणखी नव्या कितीही उत्तम असल्या तरी कागदी योजनांचा उपयोग नाहीं. चालूं पिढी जगविणें हेंच जिथें जिकिरीचें होऊन बसलें आहे तेथें पुढील पांच पन्नास पिढ्यांची काळजी वाटणें हें व्यवहारास धरून नाहीं.

उत्साहाच्या भरांत आणि नेहरूंवरील निष्ठेमुळें नियोजनाचें स्वागत केल्यावर मथाईनीं परिस्थितीचें कठोर सत्य पुढें ठेवल्यावर जाणत्या माणसाला मथाईचें म्हणणेंही बरोबर वाटूं लागतें. खरोखर पाहतां, ब्रिटिश अमदानींत सुद्धा देशविकासाच्या योजना पाऊणशें वर्षांपासून आंखल्या गेलेल्या आहेत हें आढळून येईल. निरनिराळ्या वेळीं नेमलेलीं दुष्काळ कमिशन्स, डॉ. व्होकरचा १८९० सालचा रिपोर्ट, शेती सुधारण्याबाबतचा रॉयल कमिशनचा प्रचंड रिपोर्ट, हीं आज वर्षानुवर्षें प्रामुख्यानें समोर आहेतच कीं ! त्यापैकीं आजपर्यंत काय करण्यांत आलें आहे तर नवीन नियोजन करावयाचें ? ब्रिटिश सरकार केवळ परकी म्हणून त्यांनीं त्यांच्या अमदानींत केलेल्या कामाचा धिक्कार करावयाचा काय ? ब्रिटिशांनीं शेतीस पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीनें देशभर जगप्रसिद्ध अशा सक्कर, भाटघर, भंडारदरा, मेटूर इत्यादि योजना संथपणानें काम करून पार पाडल्याच आहेत आणि निःसंशय असें वाटतें कीं त्यांनीं आमच्या चालूं सरकारपेक्षां देशांतील साधनसामुग्रीचा उपयोग हंसक्षीरन्यायानें चालविला होता. आजच्या परिस्थितींत आणखी एक नियोजन रिपोर्टाचा भारा तयार करण्यापेक्षां नुसत्या डॉ. व्होकरच्या १८९० सालइतक्या जुन्या सूचना अमलांत आल्या गेल्या तरी देशाच्या 'अन्नोत्पादन वाढीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल इतका तो लायक आहे. मग रॉयल कमिशनच्या सूचना दूरच.

वास्तविक देशाच्या उत्पादनवाढीचा प्रश्न वरून कितीही योजना ठरविल्या तरी सुटत नसून प्रत्यक्ष शेतांत काम करणाऱ्या दूर खेड्यांतील शेतकरी, गांवोगांव असलेले लहान–मोठे हस्तव्यवसाय व लहान लहान कारखाने यांत काम करणारा मजूर–मालक, किंवा मोठ्या शहरांतून असलेल्या आधुनिक प्रचंड कारखान्याच्या कोपऱ्यांत यंत्रावर काम करणारा मजूर यांच्या व्यक्तिशः प्रयत्नावर आहे. म्हणजे वाण योजना–कागदांची नसून व्यक्तिगत प्रयत्नांची व सहकार आणि सुसूत्रतेची आहे. व्यक्तिशः शेतकरी अगर मजूर जास्त जास्त कार्यक्षम कसा होईल यावर भर दिला गेला तर खरोखर टाकाऊ ठरलेल्या ब्रिटिश रिपोर्टांचा सुद्धा उद्धार होईल. यावरून सरकारचें सध्याचें मुख्य काम काय असावें हें सहजच दिसेल.

जर चालूं योजना पुऱ्या करण्याकरतां सध्याची सामुग्री आणि विशारद पुरे नाहींत तर नियोजन समितीनें आंखलेल्या योजना पुऱ्या अमलांत आणणें शक्य होणारच नाहीं हें उघड आहे. उलट, चालूं अर्थयंत्र निदान हजार पांचशें वर्षांत बसलेलें आहे–तें कसेंही गंजलेलें असो–काम करीत आहे. त्याला मात्र नियोजन समितीच्या सूचना अमलांत आणण्यानें सामुग्रीचें फिरून वांटप करावें लागून चालू रहाणीच्या मानांत अपायकारक फरक पडण्याचा संभव आहे, इतकेंच नव्हे तर चालूं योजनाही अपुऱ्या ठेऊन देऊनें त्यांत घातलेले श्रम आणि सामुग्री वाया घालवून नव्या योजनाही पुन्हा त्याच अभावीं अर्धवट सोडाव्या लागतील आणि त्याचा परिणाम देश भिकेस लागण्याकडे होईल. मथाईचा राजिनामा या दृष्टीनें डोळ्यांत अंजन घालणारा आहे यांत संशय नाहीं.

---

## आजच्या मध्यमवर्गीयांची परिस्थिति

( लेखक–श्री. छ. का. कुलकर्णी, अहमदनगर )

**प्रास्ताविक**

दि. १७ मे च्या अंकांत मध्यमवर्गीयांचें अंदाजपत्रक प्रसिद्ध झालें आहे. त्याचें संमिश्र स्वागत झालें हें मला समजलें. तें अंदाजपत्रक ४ माणसांच्या कुटुंबाचें आहे हें नमूद करावयाचें राहून गेलें आहे. तसेंच त्यांत डॉक्टराचें बिल हिशेबांत धरलेलें नाहीं. ती एक आवश्यक बाब आहे. त्याचप्रमाणें कांहींच्या मतें किराणा सामान व दूध यावर होणारा खर्च, नमूद केल्यापेक्षा पुष्कळच जास्त असला पाहिजे. या सर्व गोष्टी विचारांत घेतल्यावर असें दिसून येतें कीं, मध्यमवर्गीयाला सध्या मिळत असलेला पगार अपुरा पडतो आहे. त्यांत त्याचें भागत नाहीं. अशा परिस्थितींत त्यानें तग धरून राहण्यासाठीं काय केलें पाहिजे याबद्दलची थोडीशी माहिती प्रस्तुत लेखांत देण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे.

**परिस्थितीला जबाबदार कोण ?**

आजच्या मध्यमवर्गीयांची स्थिति फारच हलाखीची झाली आहे त्याला जबाबदार कोण ? एकटा समाज जबाबदार राहूं शकत नाहीं. तर रूढि, संवय (प्रवृत्ति) व शिकवण त्याला जबाबदार आहेत. मध्यमवर्गीयाला फक्त कारकुनी परवडते. श्रमाचें व कष्टाचें काम करणें त्याला नको असतें. त्याचप्रमाणें रूढीचें. वडील जर शाळा मास्तर असला तर मुलाची प्रवृत्ति शा. मा. होण्याकडेच जाते. फार तर हे. मा. होण्याची महत्त्वाकांक्षा उरीं बाळगील ! संवय (प्रवृत्ति) ही सुद्धां जबाबदार धरता येईल. मॅट्रिकपर्यंतचें शिक्षणच असें आहे कीं त्या चक्रांतून तो बाहेर पडला कीं कारकुनी पेशाच्या जागा शोधीत असतो. यांत्रिक व विज्ञान मार्गाकडे वळणारे फार थोडे ! वडिलांची किंवा पालकांची शिकवणसुद्धां मुलाच्या कर्तबगारीच्या आड येते. मध्यमवर्गीय आईबाप किंवा पालक आपल्या मुलाला स्वखुशीनें विमानदलांत किंवा मिलिटरीकडे नांव दाखल करूं देतील असें मला वाटत नाहीं. तात्पर्य रूढि, संवय व शिकवण या तीन बाबी मध्यमवर्गीयांची परिस्थिति हलाखीची करण्यास कारणीभूत झाल्या आहेत.

मध्यमवर्ग हा बुद्धिजीवी वर्ग आहे. समाजाचा मोठा भाग ह्या वर्गानें व्यापलेला आहे. शिक्षक व कारकून यांचा या वर्गांत समावेश होतो. (प्रोफेसर देखील येऊं शकतील !) बौद्धिक गरजा भागविणें हेंच या वर्गाचें प्रमुख कार्य असल्यामुळें त्याच्या शरीरसामर्थ्याकडे हेळसांड केली जाते ही सत्य परिस्थिति आहे. यामुळें मेहनतीचें व कष्टाळू काम या वर्गाच्या हातून होत नाहीं. तथापि समाजाला या बुद्धिजीवी वर्गाची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र समाजानें एक काळजी घ्यावयास पाहिजे नि ती म्हणजे या वर्गाला जास्तीत जास्त संतुष्ट व सुखी ठेवणें. पण, या साऱ्या गोष्टी फक्त लिहावयाच्या व बोलावयाच्या उपयोगी आहेत. प्रत्यक्ष कृतींत— ? मध्यमवर्गीयांनीं स्वतः डोळे उघडे ठेवून वागलें पाहिजे व स्वतःची परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**उपाययोजना :** खालीं दिलेल्या उपाययोजना जर अंमलांत आल्या तर आजच्या मध्यमवर्गाची आर्थिक हलाखीची परिस्थिति सुधारेल असा विश्वास वाटतो.

(१) **पगारवाढ आवश्यक:** सरकारी स्केलप्रमाणें मिळणारा पगार देखील अपुरा पडतो. म्हणून ज्या ठिकाणीं सरकारी नियमाप्रमाणें पगार मिळत नाहीं किंवा एकंदर; पगार सरकारी नियमाप्रमाणें मिळणाऱ्या पगारा इतका मिळत नाहीं, त्या ठिकाणीं तो मिळावा. सध्याचे महागाईचे दिवसांत नुसतो महागाई भत्ता वाढविण्यापेक्षां मूळ पगार वाढविणें इष्ट आहे. त्यामुळें त्यावरील प्रॉ. फंड ज्यास्त प्रमाणात कापला जाईल व नोकराची शिल्लक वाढेल. सारांश, मूळ पगारांत वाढ होणें अत्यावश्यक.

(२) **खर्चांत काटकसर:** फालतू व चैनीच्या खर्चाला शक्यतो टाळणें क्रमप्राप्त आहे. हॉटेलखर्च व सिगारेट, पान, यावर होणारा मासिक खर्च १५–२० रुपयांवर देखील जाऊं शकतो. या खर्चांत कपात झालीच पाहिजे. घरीं पोटभर जेवण मिळाल्यावर हॉटेलमध्यें जाणें आवश्यक वाटणार नाहीं. तेव्हां प्रत्येकानें विचार करून मासिक आढावा काढावा व एक महिन्याला हॉटेलाकरितां खर्च करणारा पैसा घरांत खर्च करून पहावा.

सिनेमा पाहाणें हें देखील एक व्यसन होऊन बसलें आहे. दिवसभर झालेला शीण व दगदग शमविण्यासाठीं, मनाला विरंगुळा मिळवण्यासाठी आपण थिएटरकडे धांव घेतों. परंतु त्याला बंधन घालणें आपल्या परिस्थितीच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

(३) **सेव्हिंग्ज स्कीम**–प्रत्येक मध्यमवर्गीयाला सेव्हिंग करण्याची संवय असली पाहिजे. दर महिन्याला प्रॉ. फंडाइतकी तरी रक्कम आपल्या सेव्हिंग्ज खात्यांत जमा केली पाहिजे. आणीबाणीच्या वेळीं त्याचा उपयोग होईल. स्त्रियांना काटकसरीची संवय जास्त असते. यासाठीं पतिपत्नीच्या नांवानें जोडखातें उघडावें म्हणजे खात्यांतून पैसे काढावयाचा मोह झाला तर त्यावर बंधन राहील.

(४) **शक्यतों उधारी टाळावी**–रेशन–धान्य–रॉकेल सारख्या वस्तू रोखीनेंच आणाव्या लागतात. परंतु सरपण, किराणा सामान, कापड वस्तू उधारीनें आणाव्या लागतात. ही गोष्ट शक्यतों टाळावी. कारण, यामुळें जास्त पैसा खर्च होतो. उधारीनें माल घेतल्यामुळें दुकानदार सांगेल त्या भावानें जिनसा घेतल्या जातात. तेव्हां शक्यतों उधारी टाळावी.

(५) **घरच्या गोष्टी**—इस्तरी करणें, दाढी करणें इ. आवश्यक व शक्य असणाऱ्या गोष्टी घरीं कराव्यात. यावर बाहेर पैसा जाऊं देऊं नये.

(६) **कपडा जास्त दिवस टिकविणें**—धुलाई व इस्तरी घरींच जर केली तर कपडे जास्त दिवस टिकतील असा अनुभव आहे. मध्यमवर्गीयाला रोज कपडे बदलावयास मिळत नाहींत. तेव्हां त्या दृष्टीनें कपडे जास्त दिवस टिकवणें आवश्यक आहे.

(७) **कर्ज आणि समारंभ**–कर्ज काढून सण व समारंभ साजरे करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. लग्न व मौंजी यासारखे समारंभ कमीत कमी खर्चांत पार पडले पाहिजे. ऐपतीबाहेर खर्च करून आपला मोठेपणा व ऐट दाखविणें यांत भूषण नाहीं. मुलगा झाल्याबद्दलचा सत्यनारायण किंवा परीक्षा पास झाल्याबद्दलची फिस्ट यावर होणारा खर्च अनावश्यक आहे, असें आपणांस वाटत नाहीं काय ?

(८) **विमा उतरणें आवश्यक**—प्रत्येक मिळवत्या मध्यमवर्गीयानें आपल्या आयुष्याचा विमा उतरलाच पाहिजे. कारण त्यामुळें त्याच्या उतारवयांत फार फायदा होणार आहे. विमा उतरल्यामुळें, कांहींतरी शिल्लक सक्तीनें पडतेच. मुलाच्या शिक्षणासाठीं किंवा लग्नासाठीं ज्या सोयी विमा कंपन्यांनीं काढल्या आहेत तिकडे लक्ष पुरविलें पाहिजे. अनाथाश्रमीं व

अनावश्यक खर्च टाळून विम्यांत पैसा गुंतविणें भविष्यकाळच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे.

**(९) जोडधंदा करता येणें आवश्यक**–नोकरी करून कांहीं तरी जोडधंदा केला तर मध्यमवर्गीयांची परिस्थिति निश्चित सुधारेल, पण धंदा करतां आला पाहिजे. कॅलेंडरची व संतरंज्यांची एजन्सी घेणें, विमा एजंट होणें, घरीं शिवणकाम करणें, चित्रकला अवगत असल्यास पेंटिंगचें काम करणें, विणकाम करणें इ. जोड धंदे करतां येणें शक्य आहे. त्या दृष्टीनें प्रयत्न झाल्यास ठीक पडेल. मध्यमवर्गीयाजवळ भांडवल जमणें कठिण! तेव्हां या प्रकारचेच जोडधंदे करतां येणें शक्य आहे, असें मला वाटतें.

वरील उपाययोजनेचा सारासार विचार करून प्रत्येक मध्यमवर्गीय व्यक्तीनें आपापली परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

---

### कामन्स सभेचें नवें सभागृह

जर्मन बाँब वर्षावामुळें ब्रिटिश कॉमन्स सभेचें सभागृह नाश पावलें होतें. त्या जागीं बांधण्यांत येत असलेल्या सभागृहाचें उद्‌घाटन जॉर्ज बादशहा २६ ऑक्टोबर रोजीं करतील.

---

### हातमागांसाठी राखीव उत्पादन

हातमाग धंद्यांतील चालू बिकट परिस्थिति पाहून हिंद सरकारनें सर्व तऱ्हेचा विचार करून सुती कापडाचे खालील प्रकार हातमागाच्या उत्पादनासाठी राखून ठेवण्याचें ठरविलें आहे:–१/४′ कांठाची रुंदी असलेले व झारी अगर मुगा किंवा रेशमी कांठ असलेल्या लुंगी, सॅराग आणि गोमा कांठी धोतरें; तऱ्हेतऱ्हेच्या पट्या असलेल्या लांब आणि रुंद रंगीत किनारी असलेल्या चादरी व पलंगपोस, सर्व तऱ्हेचे गॉझ, बँडेज आणि गॅकोनेट कापड, फक्त दमास्कस जातीचे ब्लिचड सोडून सर्व प्रकारचे टेबल क्लॉथ व नॅपकिन्स, जॅकगार्ड डिझाइन्स शिवाय सर्व प्रकारचे पलंगपोस व कांऊटरपान्स, सर्व प्रकारचे डस्टर्स, जाड व साधे विणलेले ८ नंबरचे किंवा त्याखालील सुताचें कापड या राखीव गोष्टी हिंद सरकारच्या सरहद्दींत वापरण्याकरितां बनविलेल्या कापडाकरितां लागू असून परदेशीं निर्यात करण्यासाठी बनविल्या जाणाऱ्या गिरणी अगर विद्युत् मालाला लागू नाहींत. १ जून १९५० पासून या धर्तीचें कापड गिरण्या व विद्युतमागाचे कारखाने यांना तयार करतां येणार नाहीं. साड्या व टॉवेल्स याबाबतींत लवकरच हुकूम निघतील.

---

### बँकेचे चेअरमन काय म्हणतात?

"सरकारच्या विशिष्ट प्रवृत्तीमुळें बँका व त्यांचे नोकर ह्यांचे-मधील संघर्ष वाढत आहे. कोणत्याहि प्रगतिप्रिय मालकास आपल्या नोकरांचें हित न पहाणें परवडणारच नाहीं. बँकिंगच्या क्षेत्रांत तर हें विशेष खरें आहे. परंतु, धंद्यास परवडेल त्यापेक्षा ज्यास्त कोणताच मालक करूं शकणार नाहीं. प्रत्येक ठिकाणच्या कामाची परिस्थिति भिन्न असते. सर्वच बँका एकाच माळेंत ओढून त्यांचेवर अवार्ड लादण्यानें बँकिंगच्या व्यवसायावर अखेर दुष्परिणामच झाल्याविना रहाणार नाहीं. बाहेरचा हस्तक्षेप, मग तो सरकारचा असला तरीहि, परस्पर विश्वास आणि निष्ठा ह्यांस बाधक होतो. बँकेंतील प्रत्येक नोकर हा एकप्रकारें बँकरच असतो. कारखान्यांतील मजूर आणि बँकेंतील नोकर ह्यांस एकाच रांगेंत ढकलणें योग्य नाहीं."

कॅनरा इं. अँड बँ. सिंडिकेट डॉ. टी. एम. ए. पै.

## ब्रिटनच्या आर्थिक प्रगतीचें रहस्य

(मा. म. काळे)

पहिल्या महायुद्धानंतर लौकरच ब्रिटनमध्यें बेकारीला सुरवात झाली, परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर गेलीं चार पांच वर्षें ब्रिटन-मध्यें असा अनुभव येत आहे कीं कामावर असणाऱ्या लोकांची संख्या दरवर्षी थोडी थोडी वाढत चालली आहे. १९४९ अखेर ब्रिटनमध्यें कामावर असणाऱ्या लोकांची संख्या २·२ कोटी किंवा एकंदर लोकसंख्येच्या ४८ टक्के होती. सध्याची कामावर असणारांची संख्या १९३९ च्या कामावर असणाऱ्या लोकांपेक्षां निश्चित जास्त आहे, परंतु ऐन युद्ध काळांत विशेषतः स्त्रियाहि नोकरी करीत असल्यामुळें कामावर असणारांची संख्या आजच्या पेक्षां जास्त होती. १९३९ च्या पासून व त्यानंतरच्या काळांत व्यापार, वाटप, स्थानिक आर्थिक गरजा, सर्व प्रकारच्या सरकारी नोकऱ्या, नवीन लहान लहान धंदे अशांमध्यें काम करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणांत वाढत चालली आहे हें एक ब्रिटनच्या अर्थव्यवहाराचें मुख्य लक्षण आहे. हल्लींच्या काळांत योजना तयार करणें, त्यासाठी कारकुनी पेशाची किंवा यांत्रिक श्रम लागणारी नोकरी करणें, कामाच्या अंमलबजावणीकडे लक्ष पुरविणें अशा तऱ्हेच्या नोकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. डिसेंबर १९४९ अखेर ब्रिटनमध्यें मूलभूत उद्योगधंद्यांत सुमारें ४२ लक्ष, मोठमोठ्या उत्पादनाच्या कारखान्यांत सुमारें ८४ लक्ष व व्यापार, बँकिंग, वहातूक, निरनिराळ्या सरकारी नोकऱ्या, बांधकाम करणें इत्यादि प्रकारच्या धंद्यांत सुमारें ९६ लक्ष लोक काम करीत होते. याप्रमाणें एकंदर २ कोटी, २२ लक्ष काम करणाऱ्या लोकांपैकी या तिसऱ्या प्रकारच्या व्यवसा-यांत ४३ टक्के लोक काम करीत आहेत. यापासून असें एक अनुमान निघतें कीं, युद्धानंतरच्या काळांत उत्पादन करणाऱ्या धंद्यांबरोबरच ब्रिटनमध्यें सामाजिक हितसंबंधाचें कार्य करण्याची वृत्ति वाढत चालली आहे. ही वृत्ति देशाच्या योग्य आर्थिक प्रगतीचें एक लक्षण आहे. कारण, सरकार व इतर संस्था यांजकडून सामाजिक स्थैर्य व स्वास्थ्य राखण्याचे विशेष प्रयत्न केले जात आहेत.

ब्रिटनमध्यें सरकारकडूनच बेकारी टाळण्याबद्दल विशेष-प्रकारें प्रयत्न केले जात आहेत. परंतु ब्रिटनमध्यें या सर्व गोष्टी शक्य झाल्या याचीं मुख्य कारणें पुढें दिलीं आहेत. मुख्य गोष्ट म्हणजे युद्ध संपल्यानंतर देशांतील एकंदर उत्पादन वाढत गेलें. १९४६ चें औद्योगिक उत्पादन १०० मानलें तर १९४७ मध्यें तें १०८ होतें, १९४८ मध्यें १२१ होतें व सध्या तें सुमारें १३५ आहे. या काळांत मजुरांची कार्यक्षमता कोणत्याहि प्रकारें कमी झाली नाहीं, तर उलट ती वाढलीच. याचबरोबर वस्तूंच्या किंमतींतहि म्हणण्यासारखे फरक न झाल्यामुळें मजुरांचे पगारहि स्थिरच राहिले. याच वेळीं अमेरिकेकडून मिळालेल्या मदतीचा उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें उपयोग करण्यांत आला. निर्गत वाढविण्यावर विशेष भर दिला गेला व सरकारनें आपलें धोरण पूर्ण वास्तववादी ठेविलें, व स्वतःच्या गरजाहि शक्य तितक्या मर्यादित ठेवण्यांत आल्या.

---

**रेल्वेसाठी एंजिनें**–साउथ इंडिअन रेल्वेसाठी रुंद रुळावर चालणारीं नऊ रेल्वे एंजिनें नुकतींच मद्रास येथें उतरवून घेण्यांत आलीं. प्रत्येक एंजिनाचें वजन १०० टन आहे.

## साबूदाण्याच्या धंद्याची संरक्षणाची मागणी

### टारिफ बोर्डाकरवीं चौकशी

घरगुती धंद्यांमुळें खेड्यांतील जनतेला काम मिळून शेतकर्‍यां नाही हंगामाव्यतिरिक्तच्या वेळांत काम करतां येतें व त्यांच्या उत्पन्नांत भर होण्यास मदत होते. साबूदाण्याचा धंदा हा दक्षिण भारतांतील एक महत्त्वाचा घरगुती धंदा असल्यामुळें या धंद्याची नीट वाढ होऊन तो स्थिरावण्यासाठी सर्व प्रकारचें उत्तेजन देणें आवश्यक आहे. असें झाल्यास खेड्यांतील जनतेचें जीवन राहाणीचें मान वाढण्यास मदत होईल. सालेम या ठिकाणीं हा धंदा मुख्यत: चालत असून तेथील साबुदाण्याचे व्यापारी कच्च्या मालासाठी साबूदाण्याचा उपयोग न करितां टॅपिओकाचा उपयोग करीत असल्यामुळें टॅपिओकाच्या धंद्यासच साबुदाण्याचा धंदा समजणें चुकीचें होईल. जानेवारी ते जून १९५० या कालासाठी साबूदाण्याची आयात करण्यासाठी परवाने देण्यांत येणार नाहींत ही गोष्ट लक्षांत घेतां संरक्षित बाजारपेठेच्या स्वरूपांत या धंद्यास सध्यां एक प्रकारचें संरक्षणच मिळत आहे.

टॅपिओकाचें उत्पादन केवळ त्रावणकोर-कोचीन संघराज्य व मद्रास राज्यांतील सालेम, अर्काट, तंजावर व त्रिचनापल्ली या जिल्ह्यांतच होत आहे. त्रावणकोर व कोचीन संघराज्यांत एकूण ५ लाख एकर जमिनींत टॅपिओकाची लागवड होते तर बाकीच्या दक्षिण भारतांत ही लागवड ४० ते ५० हजार एकर जमिनींत होते. टॅपिओकाचें उत्पादन एकरी सुमारें पांच टन आहे. सध्यां त्रावणकोर–कोचीन संघराज्यांत टॅपिओकाच्या निर्यातीस बंदी असून सालेम व त्याच्या जवळपास होणारें टॅपिओकाच्या कंदांचें सर्व उत्पादन सालेम येथील टॅपिओकाच्या दाण्याच्या धंद्यासाठींच वापरण्यांत येतें.

टॅपिओकाच्या दाण्यांचा अंतिम उत्पादन खर्च टॅपिओकाच्या कंदांच्या किंमतीवरच मुख्यत: अवलंबून असतो. गेल्या तीन वर्षांत या किंमतींत बरेच चढउतार झाले आहेत. ही किंमत १९४७ मधील मणीं ( २५ रतलाचा मण ) १। रुपयावरून १९४८ मध्यें ३ रुपयांपर्यंत चढली आणि आतां परत ती २॥ रुपयापर्यंत उतरली आहे. किंमतींत अशा प्रकारचे मोठे चढउतार होण्यास देशांतील मक्याच्या टंचाईमुळें स्टार्चच्या धंद्याच्या उत्पादकांकडून टॅपिओकासाठी होणारी मागणी, अन्नधान्याच्या सध्यांच्या महाग किंमती, टॅपिओकाच्या दाण्याच्या उत्पादकांतील स्पर्धा, या विविध गोष्टी कारणीभूत होत आहेत

टॅपिओकाच्या दाण्यांसाठी येत्या तीन वर्षांत प्रतिवर्षी ७ हजार टन याप्रमाणें मागणी येईल असें समजण्यास हरकत नाहीं. टॅपिओकाच्या दाण्यांचें प्रतिवर्षी सुमारें १९,५०० टन उत्पादन करतां येणें शक्य आहे. सध्यां या धंद्यांतील ५० कारखान्यांपैकीं केवळ २० कारखान्यांतच टॅपिओकाच्या दाण्यांचें उत्पादन होत असून प्रतिवर्षी तें सुमारें ८ हजार टन असतें.

टॅपिओकाच्या दाण्यांपासून वनस्पती गोंद, ग्लुकोज इत्यादि दुसरे पदार्थ तयार होतात. सध्यांच्या जकात करांत वाढ करून व साबूदाण्याच्या परदेशांतील आयातीवरील बंदी चालू ठेवून देशी धंद्यास संरक्षण देण्याची मागणी टॅपिओकाच्या उत्पादकांनीं केली आहे; तर देशी उत्पादकांनीं आपल्या उत्पादनाचा दर्जा वाढवावा व प्रमाणाबाहेर जादा किंमती आकारूं नये म्हणून ठराविक प्रमाणांत परदेशी साबूदाण्याची आयात करावी, असें आयातदारांनीं सांगितलें आहे.

**पुरुषांपेक्षां स्त्रियांची आयुर्मर्यादा अधिक**–अमेरिकेंतील स्त्री-पुरुषांची आयुर्मर्यादा वाढली आहे. तथापि स्त्रियांची आयुर्मर्यादा पुरुषांहून अधिक वाढली आहे. 'महिला कामगारांविषयींच्या सत्यकथा' या पुस्तिकेंत यु. अेस. सेन्सस ब्यूरोच्या प्रतिवृत्तांतील माहिती मजूर खात्यानें संकलित केली आहे. त्यावरून १९४० ते १९४९ पर्यंत अमेरिकेची लोकसंख्या १३ टक्क्यांनीं वाढली आहे. पण ६५ वर्षांहून अधिक वय असलेल्यांच्या संख्येंतील वाढ २६ टक्के आहे असें समजतें. त्यांपैकीं ६० टक्के स्त्रिया असून त्यांची संख्या २२,५०,००० आहे.

## पुणे जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ लि.

### नवे चेअरमन: श्री. खोले

पुणें जिल्हा स. खरेदी–विक्री संघाचे चेअरमन म्हणून श्री. य. द. खोले ह्यांची बोर्डानें एकमतानें निवड केली आहे. श्री. द. सो. टिळेकर हे व्हाइस चेअरमन म्हणून निवडून आले. सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारनीं बोर्डावर आपले प्रतिनिधी म्हणून श्री. दा. बा. पोतदार ह्यांची नियुक्ति केली आहे. नव्या बोर्डाची सभा ३ जून रोजीं झाली.


## BOMBAY PROVINCIAL CO-OPERATIVE INSTITUTE

Applications for the post of Senior Assistant, at the Maharashtra Regional Co-operative School, Poona, principally for publicity work in Marathi are invited from Graduates preferably with knowledge and experience of the Co-operative Movement and of publicity work. The salary of the post is Rs. 150–10–250 with such Dearness Allowance as may be sanctioned from time to time.

Applications giving details regarding age, educational qualifications, regional languages known, practical experience in Co-operation and publicity etc., should be addressed to the Executive Officer, 9, Bakehouse Lane, Fort, Bombay 1, and should reach him on or before 15th June 1950.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

( Recognised by Govt. )

Classes for the 1950–51 Session will begin on Tuesday the 20th June 1950. Students coached up for G. D. C., L. C. C., D. Com. ( I. M. C. ), C. A. ( Ist ), G. D. C. and A., Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, S.S.C. students, Matriculates and non-Matriculates. Morning and evening classes. Prospectus free on application to:

Deccan Institute of Commerce Building, 594 Budhwar Peth, Jijamata Bag corner, Poona 2. } *Secretary.*

वंडेकर लोणचीं

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९५० पासून नं. ५ बैरामजी जीजीभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९५० च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना—१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर व भोर**

—ःबँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर







हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.